**आदिवासी विकास विभागातंर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणेबाबत-**

# महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक :- सवेआ - २००९/प्र.क्र.१२०/का.११**

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक :- २९ ऑक्टोबर, २००९.**

वाचा:- 
१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक पावेआ-१०९९/ प्र.क्र.२१/९९/का.१९, दिनांक २७ मार्च,२०००.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेपूर-१२०८/प्र.क्र. ७२/सेवा-९, दि. ०६ ऑक्टोबर,२००८.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेपूर-१२०९/प्र.क्र. २०/सेवा-९, दि. २७ फेब्रुवारी,२००९.
४) शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. वेपूर-१२०९/प्र.क्र. २७/सेवा-९, दि. २२ एप्रिल,२००९.
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. वेपूर-१२०९/प्र.क्र. ६९/सेवा-९, दि. २९ एप्रिल,२००९.
६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक :सवेआ/ १००८/ (५२१/०८)/माशि -२, दिनांक १२ जून,२००९.
७) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे पत्र क्रमांक अआशा-०७/प्र.क्र.१३९/का.७(१), दिनांक २७ ऑगस्ट,२००९ व २४ सप्टेंबर,२००९.

<u>प्रस्तावना :-</u> सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी यांना सुधारीत वेतन श्रेणी लागू करण्याची शिफारस करण्याकरिता श्री. पी. एम. ए. हकीम, सेवानिवृत्त सचिव, केंद्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली "राज्य वेतन सुधारणा समिती, २००८" नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी शासनाने काही फेरफारांसह उपरोक्त दिनांक २७, फेब्रुवारी,२००९ च्या शासन निर्णयान्वये स्विकृत केलेल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ अधिसूचित करण्यात आले आहेत. तसेच सदर नियमानुसार

प्रारंभिक वेतन निश्चितीबाबतची सविस्तर कार्यपध्दती वित्त विभागाच्या दिनांक २९ एप्रिल,२००९ च्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आलेली आहे.

२. शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली, स्वेच्छा संस्थांमार्फत अनुदानित तत्वावर चालविण्यात येणाऱ्या मान्यताप्राप्त प्राथमिक आणि माध्यमिक अशासकीय शाळा, उच्च माध्यमिक आणि अध्यापक विद्यालये यामधील पूर्णवेळ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक सवेआ/१००८/(५२१/०८)/माशि-२, दिनांक १२ जून,२००९ अन्वये सुधारीत वेतनश्रेण्या लागू करण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखाली, स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदानित तत्वावर चालविण्यात येणाऱ्या आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेण्या लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

**शासन निर्णय :-**

पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्य शासनाने घेतलेले निर्णय आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखाली स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या आदिवासी आश्रमशाळांमधील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेण्या लागू करण्यात आल्या होत्या. त्याच धर्तीवर सदर आश्रमशाळांमधील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासनाने मंजूर केलेल्या सुधारीत वेतनश्रेण्या तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९, दिनांक १ जानेवारी,२००६ पासून जसेच्या तसे लागू करण्यात येत आहेत. त्यानुसार संबंधित कर्मचा-यांची वेतननिश्चिती वित्त विभागाच्या दिनांक २९ एप्रिल,२००९ च्या परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार करण्यात यावी.

२. सुधारीत वेतनश्रेण्यांनुसार अनुज्ञेय होणारे वेतन व भत्ते दिनांक १ एप्रिल, २००९ पासून रोखीने अदा करण्यात यावेत. दिनांक १ जानेवारी,२००६ ते ३१ मार्च,२००९ पर्यंतच्या कालावधीतील थकबाकी, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-वेपुर-१२०८/प्र.क्र.७२/सेवा-९, दिनांक ६ ऑक्टोबर,२००८ अन्वये मंजूर केलेल्या अग्रिमाची रक्कम समायोजित करुन पुढील पाच वर्षात पाच समान हप्त्यात संबंधित कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी.

३. सुधारीत वेतन संरचनेत वेतन निश्चिती करण्यासाठी आवश्यक तो विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत देण्यात यावा. एकदा दिलेला विकल्प अंतिम राहील.

४. सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेण्या व इतर लाभ मंजूर करण्याच्या संदर्भात शासनाच्या वित्त विभागाद्वारे जे जे आदेश वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील ते ते सर्व आदेश आदिवासी विकास विभागातंर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू राहतील.

५. या आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या सुधारीत वेतन संरचनेमुळे होणारा अतिरिक्त खर्च, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येतो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी सुधारीत अंदाज तयार करताना सदर अतिरिक्त खर्च विचारात घेवून अतिरिक्त अनुदानाची मागणी करावी व यासाठी आवश्यक ती वित्तीय तरतूद करण्यात यावी.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३४२/२००९/ व्यय-१४, दिनांक २३.१०.२००९ अनुसार त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या बेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९१०२९१३२८०९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ग. गो. पंचभाई )
शासनाचे सह सचिव,

सहपत्र : जोडपत्र एक ते तीन.

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
प्रधान सचिव, वित्त विभाग (व्यय-१४ / सेवा-९ ), मंत्रालय, मुंबई.
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा परीक्षा ), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
आयुक्त, आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/नागपूर/अमरावती/ठाणे.
शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षण अधिकारी (प्राथमिक/माध्यमिक).
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
कक्ष अधिकारी, अर्थसंकल्प (का.०६), आदिवासी विकास विभाग.
निवड नस्ती (का.११).

## जोडपत्र - एक
## शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग
## क्रमांक सवेआ-२००९/ प्र.क्र.१२०/का.११, दिनांक २८.१०.२००९ चे जोडपत्र.

| प्राथमिक आश्रमशाळा विभाग | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदनाम | ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी (विद्यमान) | शालेय शिक्षण विभागाने सुधारीत वेतन संरचनेत दिनांक १२ जुन २००९ च्या शासन निर्णयानुसार मंजूर केलेले वेतन | |
| | | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| १ | प्राथमिक मुख्याध्यापक (प्राथमिक आश्रमशाळा) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० |
| | | ६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी) | ९३००-३४८०० | ४४०० |
| | | ७५००-१२००० (निवड श्रेणी २०% पदांसाठी ) | ९३००-३४८०० | ४८०० |
| २ | पदवीधर प्राथमिक शिक्षक (प्रशिक्षित) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० |
| | | ६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी) | ९३००-३४८०० | ४४०० |
| | | ७५००-१२००० (निवड श्रेणी २०% पदांसाठी) | ९३००-३४८०० | ४८०० |
| ३ | प्रशिक्षित प्राथमिक शिक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० |
| | | ५०००-८००० (वरिष्ठ श्रेणी) | ९३००-३४८०० | ४२०० |
| | | ५५००-९००० (निवड श्रेणी २०% पदांसाठी ) | ९३००-३४८०० | ४३०० |
| ४ | अप्रशिक्षित प्राथमिक शिक्षक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २००० |

| माध्यमिक आश्रमशाळा विभाग | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | पदनाम | ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी (विद्यमान) | शालेय शिक्षण विभागाने सुधारीत वेतन संरचनेत दिनांक १२ जुन २००९ च्या शासन निर्णयानुसार मंजूर केलेले वेतन | |
| | | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| ५ | माध्यमिक मुख्याध्यापक / (माध्यमिक आश्रमशाळा) | ७५००-१२००० | ९३००-३४८०० | ४८०० |
| | | ८०००- १३५०० (वरिष्ठ श्रेणी) | १५६००-३९१०० | ५४०० |
| ६ | माध्यमिक शिक्षक (प्रशिक्षित) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० |
| | | ६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी) | ९३००-३४८०० | ४४०० |
| | | ७५००-१२००० (निवड श्रेणी २०% पदांसाठी) | ९३००-३४८०० | ४८०० |
| ७ | अप्रशिक्षित पदवीधर शिक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० |
| ८ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० |
| ९ | प्रयोगशाळा सहाय्यक (मॅट्रीक पदार्थ विज्ञान, रसायन विषयासह ) | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २००० |
| १० | प्रयोगशाळा परिचर (पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र हे विषय घेऊन एस.एस.सी.साठी पूर्व वर्गापर्यत शिकलेले) | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० |
| ११ | इतर प्रयोगशाळा परिचर | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३०० |
| १२ | शिपाई | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३०० |

| उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालय विभाग | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | पदनाम | ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी (विद्यमान) | शालेय शिक्षण विभागाने सुधारीत वेतन संरचनेत दिनांक १२ जुन २००९ च्या शासन निर्णयानुसार मंजूर केलेले वेतन | |
| | | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| १३ | उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालय पुर्णवेळ शिक्षक | ७२२५-२२५-११०५० (प्रथमश्रेणी) | ९३००-३४८०० | ४६०० |
| | | ८०००-२७५-१३५०० (द्वितीय श्रेणी) | १५६००-३९१०० | ५४०० |
| | | ९१२५-२७५-१४०७५ (निवड श्रेणी) | १५६००-३९१०० | ५७०० |

| आश्रमशाळा वसतीगृह विभाग | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | पदनाम | ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी (विद्यमान) | वसतीगृह विभागातील पदांचा वेतन श्रेण्यांचा शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक १२ जून २००९ च्या शासन निर्णयात उल्लेख नसल्याने त्यांच्या समकक्ष वेतन श्रेण्यांसाठी असलेला वेतन बँण्ड व ग्रेड वेतन विचारात घेवून खालील बँण्ड व ग्रेड वेतन समाविष्ठ केले आहे. | |
| | | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| १४ | वसतीगृह अधिक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० |
| | | ५८००-८००० (वरिष्ठ श्रेणी) | ९३००-३४८०० | ४२०० |
| | | ५०००-९००० (निवड श्रेणी २० टक्के पदासाठी) | ९३००-३४८०० | ४३०० |
| १५ | स्वयंपाकी | २६१०-४००० | ४४४०-७४४० | १३०० |
| १६ | कामाठी | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३०० |
| १७ | स्वयंपाकी मदतनीस | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३०० |

**जोडपत्र - दोन**

**शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग**

**क्रमांक सवेआ-२००९/ प्र.क्र.१२०/का.११, दिनांक २९.१०.२००९ चे जोडपत्र.**

**विकल्पाचा नमूना**

१ (अ) कर्मचाऱ्याचे नांव श्री./श्रीमती/कुमारी

(ब) धारण केलेले पद

कायम / स्थानापन्न

(क) विद्यमान वेतनश्रेणी रुपये

(ड) सुधारीत वेतनश्रेणी संरचना- वेतन बँड रुपये ________ ग्रेड वेतन रुपये

(ई) कार्यालयाचे नांव

२. मी श्री./श्रीमती/कुमारी

याद्वारे :-

* १ जानेवारी, २००६ पासून सुधारीत वेतनश्रेणीची निवड करतो / करते.
* मी, धारण करीत असलेल्या पदाची विद्यमान श्रेणी पुढीलप्रमाणे चालू ठेवण्याची निवड करतो / करते.
* माझ्या पुढील वेतनवाढीच्या तारखेपर्यन्त
* माझे वेतन रुपये पर्यन्त वाढवणाऱ्या माझ्या नंतरच्या वेतनवाढीच्या तारखेपर्यन्त
* मी पद रिक्त करीपर्यन्त किंवा विद्यमान श्रेणीत वेतन घेण्याचे बंद करीपर्यन्त

३. हा विकल्प अंतिम असून, त्यामध्ये हया तारखेनंतर सुधारणा करण्यात येणार नाही.

ठिकाण

दिनांक:-

सही

नांव:-

---

(कार्यालयाने भरावयाचे)

प्रमाणित करण्यात येते की, * कायम स्थानापन्न पद धारण करीत असलेल्या श्री/श्रीमती/कुमारी

यांनी हा विकल्प यथोचितरित्य स्वाक्षरीसह व विहित दिनांकापर्यन्त मला सादर केला आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

सही

नांव

कार्यालय प्रमुख

* लागू नसेल ते खोडावे.

# जोडपत्र - तीन

## शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग

क्रमांक सवेआ-२००९/ प्र.क्र.१२०/का.११, दिनांक२९.१०.२००९ चे जोडपत्र.

| अ.क्र. | दि. १.१. २००६ पासून सुधारित वेतनश्रेण्या वेतन बँड | ग्रेड वेतन |
|---|---|---|
| १ | ९३००-३४८०० | ४,३०० |
| | ९३००-३४८०० | ४,४०० |
| | ९३००-३४८०० | ४,८०० |
| २ | ५२००-२०२०० | २,८०० |
| | ९३००-३४८०० | ४,२०० |
| | ९३००-३४८०० | ४,३०० |
| ३ | ५२००-२०२०० | २,००० |
| ४ | ९३००-३४८०० | ४,८०० |
| | १५६००-३९१०० | ५,४०० |
| ५ | ९३००-३४८०० | ४,३०० |
| | ९३००-३४८०० | ४,४०० |
| | ९३००-३४८०० | ४,८०० |
| ६ | ५२००-२०२०० | २,८०० |
| ७ | ५२००-२०२०० | २,४०० |
| ८ | ५२००-२०२०० | १,९०० |
| ९ | ५२००-२०२०० | २,८०० |
| १० | ५२००-२०२०० | २,४०० |
| ११ | ५२००-२०२०० | २,००० |
| १२ | ५२००-२०२०० | १,९०० |
| १३ | ४४४०-७४४० | १,३०० |
| १४ | ४४४०-७४४० | १,६०० |
| १५ | ४४४०-७४४० | १,३०० |
| १६ | ५२००-२०२०० | १,८०० |
| १७ | ५२००-२०२०० | २,८०० |
| | ५२००-५२०० | २,४०० |
| १८ | ४४४०-७४४० | १,३०० |
| १९ | ४४४०-७४४० | १,६०० |
| २० | ४४४०-७४४० | १,३०० |

----------